परिपत्रक क्रमांक : ६१
जनरल विभाग,

रयत शिक्षण संस्था, सातारा.
दिनांक : ३१/१२/२०१८

सर्वश्री शाखाप्रमुख ,
रयत शिक्षण संस्था,

यांना . . . . . .

**विषय - देणगी स्वीकारुन नाव देणेबाबत .**

देणगी स्वीकारुन संस्थेच्या कोणत्याही विद्यालयास, विद्यालयाच्या इमारतीतील खोली, सभागृह/दालन इत्यादीस नाव देणेबाबत संस्थेने सन १९८१ मध्ये धोरण ठरवून त्यात वेळोवेळी बदल केलेले आहेत. त्याचप्रमाणे सद्य:स्थितीचा विचार करुन संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलने ठराव नं.११ दि.२३/११/२०१८ नुसार नाव देण्यासाठी स्वीकारावयाच्या देणगी रकमेत वाढ केलेली आहे.

**देणगी स्वीकारुन नाव देणेबाबत असणारे संस्थेचे धोरण -**

१. शाखा स्थापन करताना अगर सर्वसाधारण स्वरुपाची नावे दिलेल्या शाखेस एखाद्या व्यक्तिने आपले नाव देणेविषयी विनंती केल्यास नाव देण्याबाबतीत ठरलेली देणगी देणार असल्यास त्याचे इच्छेप्रमाणे शाखेस सुरुवातीपासून अगर योग्यवेळी नाव द्यावे .

२. अ) ग्रामदेवतेच्या अगर थोर व्यक्तिच्या नावाने चालविलेल्या शाखेच्या नावात केवळ देणगी मिळण्याची शक्यता आहे म्हणून बदल करु नये .

ब) देणगी स्वीकारुन एखाद्या व्यक्तिचे नाव शाखेस दिल्यास अगर नाव देण्याच्याबाबतीत निश्चित विचार झाला असल्यास त्याच शाखेस दुस-याकडून जास्त देणगी मिळण्याची शक्यता निर्माण झाल्यास पूर्वीच्या निर्णयात बदल करु नये .

३. देणगी स्वीकारुन नाव देणेबाबतचा देणगीदाराचा अर्ज शाखाप्रमुखांनी प्रथम संस्थेकडे पाठवून द्यावा. सदर अर्जावर संस्थेचे चेअरमन, संबंधित विभागाचे चेअरमन व संस्थेचे सेक्रेटरी यांची त्रिसदस्य समिती प्राथमिक निर्णय घेईल. त्यानंतर कार्यालयाने शाखाप्रमुखाकडून स्कूल कमिटी / स्थानिक व्यवस्थापन समितीचा ठराव व विभागीय अधिका=यांकडून विभागीय समितीची शिफारस घेऊन नामकरणाचा प्रस्ताव मॅनेजिंग कौन्सिलच्या बैठकीत मंजूरीसाठी ठेवावा. शाखाप्रमुखांनी ठरावानुसार देणगीची संपूर्ण रक्कम मिळाल्यावर पुढील कार्यवाही करावी .

४. देणगीची सर्व रक्कम एका हप्त्यात स्वीकारुन नंतरच देणगीदाराचे नाव द्यावे .

पान नं. २ वर

५. **मॅनेजिंग कौन्सिलच्या ठरावानुसार व्यक्तिगत नाव देण्यासाठी स्वीकारावयाची देणगी खालीलप्रमाणे -**

| **अ) प्राथमिक शाळेसाठी -** | **स्वीकारावयाची देणगी** |
|---|---|
| ०१. पूर्वप्राथमिक शाळा (शाळा सुरू होऊन किमान ५ वर्षे पूर्ण झालेली असावीत .) | रू.३५ लाख |
| ०२. निम्न प्राथमिक शाळा | रू.४५ लाख |
| ०३. पूर्ण प्राथमिक शाळा | रू.५० लाख |
| **ब) माध्यमिक शाळेसाठी -** | |
| ०१. एस.एस.सी.अखेर ६ तुकडया पर्यंतचे हायस्कूलसाठी | ४५ लाख |
| ०२. एस.एस.सी.अखेर ७ ते ९ तुकडया पर्यंतचे हायस्कूलसाठी | ५० लाख |
| ०३. एस.एस.सी.अखेर १० ते १२ तुकडया पर्यंतचे हायस्कूलसाठी | ६० लाख |
| ०४. एस.एस.सी.अखेर १३ ते १५ तुकडया पर्यंतचे हायस्कूलसाठी | ६५ लाख |
| ०५. एस.एस.सी.अखेर १६ ते १८ तुकडया पर्यंतचे हायस्कूलसाठी | ७० लाख |
| ०६. एस.एस.सी.अखेर १९ ते २१ तुकडया पर्यंतचे हायस्कूलसाठी | ८० लाख |
| ०७. एस.एस.सी.अखेर २२ ते २४ तुकडया पर्यंतचे हायस्कूलसाठी | ८५ लाख |
| ०८. एस.एस.सी.अखेर २५ ते २९ तुकडया पर्यंतचे हायस्कूलसाठी | ९५ लाख |
| ०९. ३० पेक्षाजास्त तुकडयांचे हायस्कूलसाठी | १ कोटी |

| **क) माध्यमिक विभागास जोडून असणा-या उच्च माध्यमिक / ज्युनि.कॉलेज विभागासाठी स्वीकारावयाची देणगी खालीलप्रमाणे** | |
|---|---|
| **०१. एका विभागास-** | |
| कला विभागासाठी | रू. ३५ लाख |
| वाणिज्य विभागासाठी | रू. ३५ लाख |
| शास्त्र विभागासाठी | रू. ४५ लाख |
| **०२. दोन विभागासाठी -** | |
| कला व वाणिज्य विभागासाठी | रू. ४५ लाख |
| कला व शास्त्र विभागासाठी | रू. ५० लाख |
| वाणिज्य व शास्त्र विभागासाठी | रू. ५० लाख |

**पान नं. ३ वर**

| | |
|---|---|
| **३. कला, वाणिज्य व शास्त्र या तीन विभागासाठी** | रू. ५५ लाख |
| **ड) सीनियर कॉलेजला जोडून असणा-या ज्युनि.कॉलेज विभागासाठी** | |
| **०१. एका विभागासाठी -** | |
| कला विभागासाठी | रू. ५० लाख |
| वाणिज्य विभागासाठी | रू. ५० लाख |
| शास्त्र विभागासाठी | रू. ६० लाख |
| **०२. दोन विभागासाठी -** | |
| कला व वाणिज्य विभागासाठी | रू. ६५ लाख |
| कला व शास्त्र विभागासाठी | रू. ७० लाख |
| वाणिज्य व शास्त्र विभागासाठी | रू. ७० लाख |
| **०३. कला, वाणिज्य व शास्त्र या तीन विभागासाठी** | रू. ९५ लाख |
| **इ ) वसतिगृहाचे इमारतीसाठी-** | |
| २५ विद्यार्थ्यांचे वसतिगृह | रू. ३० लाख |
| २५ पेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे वसतिगृह | रू. ३५ लाख |
| **ई ) किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी** | रू. ३५ लाख |
| **फ)** मंबई,पुणे,कोल्हापूर व सोलापूर वगैरे सारख्या महानगरपालिका हद्दीतील शाखा इंग्रजी माध्यमाची विद्यालये व वरिष्ठ महाविद्यालये यांच्या नामकरणाचे प्रस्ताव देणगीची रक्कम निश्चित करण्यासाठी मॅनेजिंग कौन्सिलमध्ये ठेवण्यात यावेत. मॅनेजिंग कौन्सिलने नामकरणासाठी स्वीकारावयाच्या देणगीची रक्कम स्थानिक परिस्थिती व त्या शाखेची भविष्यकाळात होणारी वाढ यांचा विचार करुन निश्चित करावी. | |

६. **शाखेच्या अंतर्गत भागास नाव देणे -**

१. वर्गखोली २. प्रयोगशाळा ३. सभागृह ४. ड्रॉईंग हॉल ५. जिमखाना ६. ग्रंथालय ७. वाचनालय ८. अभ्यासिका वगैरे बाबीपैकी कोणत्याही विभागाच्या खर्चासाठी लागणारी संपूर्ण रक्कम देणगीदाराने दिल्यास त्याचे नाव त्या विभागास द्यावे तसेच खर्चाच्या ५०% रक्कम दिल्यास सदर विभागाच्या दर्शनी बाजूस त्याच्या देणगीचा उल्लेख असलेला २ x १.५ फूटाचा नामफलक लावण्यात यावा आणि त्यापेक्षा कमी रक्कम दिल्यास संबंधित देणगीदाराचे नाव त्या शाखेमध्ये दर्शनी बाजूच्या ठिकाणी एक बोर्ड तयार करुन इतर देणगीदारांचे यादीत द्यावे .

८. देणगी शक्यतो पैशाच्या स्वरुपात असावी. तथापि संस्थेस उपयुक्त होईल अशा त-हेचा माल, साहित्य, जमीन/जागा, इंजिन इत्यादी स्वरुपात देणगी स्वीकारण्यास हरकत नाही. देणगीदाराचे नाव देताना वरील बाबींची पैशाच्या स्वरुपात पंचमगदुरामने किंमत ठरवून देणगीचा स्वीकार करावा

९. देणगीदाराचे व्यक्तिगत नाव शाखेस देण्याचा विचार करताना त्या नावास स्थानिक पाठिंबा आहे किंवा कसे याची खात्री करुन घ्यावी.

१०. देणगी स्वीकारुन नाव देणेबाबत झालेल्या ठरावानुसार देणगीची संपूर्ण रक्कम मिळाल्या नंतरच शाखाप्रमुखांनी नामकरणाची कार्यवाही करावी .

सचिव,
**रयत शिक्षण संस्था, सतारा**

**प्रत माहितीसाठी :**

०१. सहसचिव (उ.शि.), रयत शिक्षण संस्था, सातारा.
०२. सहसचिव (माध्य.), रयत शिक्षण संस्था, सातारा.
०३. ऑडिटर, रयत शिक्षण संस्था, सातारा.
०४. सर्वश्री विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था,

Kishore/Paripatrak/ Denagi Swikaru Name Change p* 1-4